Vol. 1, Issue . 1 / February 2011 , pp.118-123

Research Paper - Economics

# नागरी सहकारी बँका विषयीचे बदलते धोरण

**डॉ. बी. एच. दामजी**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
दयानंद महाविद्यालय, सोलापूर.

**प्रास्ताविक :**

नागरी सहकारी बँका या ग्राहक व पतपुरवठा या दृष्टीने वैशिष्ठ्यपूर्ण आहेत. अल्प उत्पन्न गटातील व मध्यम वर्गातील लोकांमध्ये काटकसर व स्वयंसहाय्यतेची प्रवृत्ती वाढविणे आणि त्यांना त्यांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी मदत करणे या दृष्टीने या बँकांचे कार्य महत्वाचे आहे. या बँका गरीब व अल्प साधने असणाऱ्यांना पतपुरवठा करून त्यांचा जीवनस्तर उंचावण्याचा प्रयत्न करतात. स्थानिक भावना, परिचय आणि सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचण्याची प्रवृत्ती या कारणांमुळे या बँकांना अधिक महत्व प्राप्त झाले आहे. भारतात स्वातंत्र्योत्तर काळात नागरी सहकारी बँकांची संख्या, शाखाविस्तार, ठेवी, कर्जे, गुंतवणूक इत्यादी बाबतीत प्रगती झाली. पण त्याचबरोबर दुर्बल नागरी सहकारी बँकांची संख्याही वाढत गेली. गैरव्यवस्थापन, सदोष कर्जवाटप, रोखे घोटाळे, वाढती थकबाकी इत्यादी कारणांमुळे या बँकांची दुर्बलता वाढली. यामुळे या बँकांवरील लोकांचा विश्वास डळमळीत होत आहे. परिणामी, लोकांचा विश्वास वाढविण्याबरोबरच या बँकांना स्वत:ची आर्थिक स्थिती सुधारण्याचे प्रयत्न करावे लागत आहेत. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर रिझर्व्ह बँकेने बॅंकिंग धोरणात अनेक बदल केले आहेत. या बदलांचे परिणाम इतर बँकांप्रमाणेच नागरी सहकारी बँकांवरही होत आहेत. नागरी सहकारी बँकांच्या संदर्भातील रिझर्व्ह बँकेच्या धोरणाची सविस्तर चर्चा प्रस्तूत लेखात केली आहे.

नागरी सहकारी बँकांचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने शहरी विभागापुरते मर्यादित असते. या बँकांनी नागरी भागात बँक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात असे उद्दिष्ट असते. अलीकडे रिझर्व्ह बँकेच्या नव्या धोरणानुसार या बँकांना आपल्या शाखा इतरत्र सुध्दा काढता येतात. सामान्यपणे बँकेचे कार्यक्षेत्र बँकेच्या उपविधीत नमूद केलेले असते. सहकारी निबंधकाच्या पुर्वपरवानगीने या कार्यक्षेत्रात बदल घडवून आणता येतो.

**भारतातील नागरी सहकारी बँकांची प्रगती**

भारतातील नागरी सहकारी बँकांची प्रगती पुढील कोष्टकात दर्शविली आहे.

(आकडे कोटी रुपयांत)

| तपशील | १९९६ | १९९७ | १९९८ | २००६ | २००८ |
|---|---|---|---|---|---|
| नागरी सहकारी बँकांची संख्या | १३२६ | १३६३ | १८१० | १८५३ | १७७० |
| स्वत:चा निधी | ३८४८ | ४६९५ | ५६५० | — | १९४९९ |
| ठेवी | २४१६५ | ३०७१५ | ३८४७५ | ११२२३७ | १३८४९६ |
| कर्जे | १७९०८ | २१५५० | २६४५५ | ७०३७९ | — |

Sources : 1) Various issues of Annual Report of RBI.
2) Various issues of report on Trend and Progress of Banking in India.

वरील कोष्टकावरून अलीकडील काळात नागरी सहकारी बँकांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसते. तसेच बँकांच्या स्वनिधीतसुध्दा चांगली वाढ झाली आहे. सन १९९६ ते २००६ या दहा वर्षात नागरी सहकारी बँकांकडील ठेवी २४१६५ कोटी रुपयांपर्यंत वाढल्या आहेत. म्हणजेच

या कालावधीत ठेवीमध्ये जवळपास साडेचारपटीइतकी वाढ झाली आहे. तसेच याच काळात नागरी सहकारी बँकांनी दिलेल्या कर्जात जवळपास चौपटीइतकी वाढ झाली आहे. यावरून नागरी बँकांची प्रगती लक्षात येते.

### जागतिकीकरणाचे धोरण :

भारताने नव्या आर्थिक धोरणाचा स्वीकार करून उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाची तत्त्वे स्वीकारली. जागतिकीकरणाच्या धोरणाचे नागरी सहकारी बँकांवर व एकंदरित सहकारी चळवळीवर परिणाम होत आहेत. सामान्यपणे, राज्याच्या राजकीय सीमेबाहेर आर्थिक व्यवहारांचा विस्तार करणे म्हणजे जागतिकीकरण होय. जगातील सर्व देशांची एक सामूहिक बाजारपेठ निर्माण करणे व त्या बाजारपेठेत जगातील साधनसामग्रीचे व उत्पादन घटकांचे सहजपणे स्थानांतर होईल अशी व्यवस्था करणे म्हणजे जागतिकीकरण होय. जागतिकीकरणात मुक्त अर्थव्यवस्था अभिप्रेत असते.

जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर बँकिंग व वित्तीय क्षेत्र मजबूत बनविण्यासाठी सन १९९१ मध्ये नरसिंहम समिती नियुक्त करण्यात आली. या समितीच्या अहवालानुसार सरकारने बँकिंग आणि वित्तीय क्षेत्रात सुधारणा घडवून आणल्या. जागतिकीकरणाच्या धोरणामुळे भारतातील बँकिंग क्षेत्रात स्पर्धा निर्माण झाली आहे. व्यापारी बँका, राष्ट्रीयीकृत बँका, खाजगी बँका, सहकारी बँका, विदेशी बँका यांच्यातील स्पर्धा वाढली आहे. अर्थात, या स्पर्धेत उतरून आपली कार्यक्षमता सिध्द करणे नागरी सहकारी बँकांना कठीण जात आहे. नागरी सहकारी बँकांना इतर बँकाप्रमाणे ग्राहकांना निरनिराळ्या सेवा सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागत आहेत. यासाठी या बँकांना आपली आर्थिक स्थिती मजबूत करण्यावर भर द्यावा लागणार आहे. नागरी सहकारी बँकांवर रिझर्व बँक अधिक प्रभावीपणे नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे. यामुळे रिझर्व बँकेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी या बँकांवर राहणार आहे. रिझर्व बँक नागरी बँकांना इतर व्यापारी बँकाप्रमाणे वागणूक देत असल्याने या बँकांना आपली स्पर्धाक्षमता व नफाक्षमता वाढवावी लागणार आहे. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर रिझर्व बँक आपल्या धोरणात बदल करीत असल्याने नागरी बँकांना आपल्या कार्यपध्दतीत बदल करावे लागणार आहेत.

## रिझर्व्ह बँकेचे बदलते धोरण

### धोरणात्मक बदल :

रिझर्व बँक, राज्य सरकारे आणि नागरी सहकारी बँकाचे प्रतिनिधी यांच्यातील चर्चेच्या माध्यमाव्दारे दृष्टिकोणाभिमुख धोरण स्वीकारून दुहेरी नियंत्रणाशी संबंधीत विषयावर लक्ष केंद्रित करण्याचे ठरविण्यात आले. या संदर्भातील सामंजस्य करारावर (MOU) आतापर्यंत एकूण आठ राज्यांनी सह्या केलेल्या आहेत. नागरी सहकारी बँकांचे क्षेत्र मजबूत व सदृढ बनविण्यासाठी कमकुवत बँकांचे विलिनीकरण व सम्मीलन अबाधित समापनाव्दारे निश्चित करण्यात आले. तसेच नागरी बँकांचे भांडवल वाढविण्यासाठी पोषक वातावरण निर्मितीवर भर देण्यात आला. यामुळे आर्थिकदृष्ट्या सदृढ नागरी बँकाची कमकुवत बँका स्वत:च्या ताब्यात घेण्याची ताकद वाढेल.

बदलत्या परिस्थितीनुसार नागरी सहकारी बँकांच्या संदर्भातील दूरदर्शी निकषांमध्येही योग्य बदल करण्यात आले आहेत. नागरी बँकांचे शुल्क आधारित उत्पन्न व व्याजेतर उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांना व्यवसायाच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. कर्जपुरवठा, ग्राहक सेवा, वित्तिय समावेशन आणि वित्तिय बाजारपेठा इत्यादींबाबत व्यापारी बँकाप्रमाणेच नागरी बँकांबाबतही सुधारणा करण्यात आल्या आहेत.

### रचनात्मक सुधारणा :

रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांच्या पुनरूज्जीवनासाठी उचललेले सर्वात महात्त्वाचे पाऊल

म्हणजे मध्यावधी रचना (Medium-term Framework) होय. यांत नागरी बँकांशी संबंधित पैलूंच्या राज्यनिहाय व्युहरचनेचा समावेश आहे. या व्युहरचनेचा एक भाग म्हणून रिझर्व्ह बँक आणि संबंधित राज्य सरकार यांच्यात सामंजस्य करार केले जात आहेत. ऑक्टो. २००६ पर्यंत आंध्रप्रदेश, गुजरात, कर्नाटक, मध्यप्रदेश, उत्तरांचल, राजस्थान, छत्तीसगढ, गोवा या आठ राज्यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या आहेत. या कराराप्रमाणे नागरी बँकांसाठी कार्यबलाची नियुक्ती केली जाते की, जे राज्यातील अर्थक्षम आणि बिगर अर्थक्षम नागरी बँका ओळखू शकेल आणि अर्थक्षम बँकांना आणखी मजबूत करण्यासाठी व इतर बँकांच्या अबाधीत समापनासाठी समयबध्द नियोजन करू शकेल.

सुचित नागरी बँकांचे महत्त्व लक्षात घेऊन रिझर्व्ह बँकेने ऋणात्मक निव्वळ मत्तेच्या सुचित नागरी बँकांना पुनर्जिवित करण्यासाठी व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्य सरकारशी चर्चा करण्याची प्रक्रिया सुरू केली. नागरी बँकांच्या पुनर्वसनाच्या योजनेची रूपरेषा आणि देखरेख यांना योग्य लक्ष्य बनवून त्यांच्या पुनर्संघटनासाठी समयबध्द नियोजनावर भर देण्यात आला. सन २००५–०६ या वर्षात एकूण १० नागरी सहकारी बँकांच्या पुनर्संघटनेची प्रक्रिया सुरू झाली. ठेवीदारांच्या हितरक्षणासाठी आणि व्यवस्थात्मक त्रुटी दूर करण्यासाठी रिझर्व्ह बँक या बँकांवर देखरेख ठेवून आहे.

नागरी सहकारी बँकांवर रिझर्व्ह बँक आणि राज्य सरकार असे दुहेरी नियंत्रण असते. नागरी बँक क्षेत्राच्या विकासात उत्तेजन देण्याच्या उद्देशाने या बँकांचे नियमन आणि पर्यवेक्षणाबाबत सुसंवाद साधण्याचे प्रयत्न केले जात आहेत. प्रस्थापित वैधानिक चौकटीतील दुहेरी नियंत्रणाशी निगडित प्रश्न सोडविण्यासाठी सामंजस्य कराराची व्यवस्था करण्याचे ठरविण्यात आले आहे. या संदर्भातील करारावर आतापर्यंत आंध्र प्रदेश, गुजरात, कर्नाटक, मध्यप्रदेश, आणि उत्तरांचल अशी पाच राज्ये सहभागी झाली आहेत. नागरी सहकारी बँकाची अधिक संख्या असलेल्या इतर राज्यांनीही सामंजस्य करारासाठी रिझर्व्ह बँकेशी संपर्क साधला आहे. राज्यातील अर्थक्षम व बिगर अर्थक्षम नागरी सहकारी बँकांची ओळख पटविणे, अर्थक्षम नागरी बँकाची वित्तीय शक्ती वाढविणे आणि बिगर अर्थक्षम नागरी बँकाचे अबाधित समापन करण्याकरिता कार्यक्रम तयार करणे इत्यादी जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत.

नागरी सहकारी बँकांना मजबूत करण्याचा एक भाग म्हणून रिझर्व्ह बँकेने फेब्रुवारी २००५ मध्ये नागरी बँकांच्या विलीनीकरणाबाबत किंवा सम्मीलनाबाबत मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. ठेवीदारांचे हितरक्षण आणि विलीनीकरण झालेल्या बँकेचा वित्तीय मजबूतपणा यावर या तत्त्वांमध्ये भर देण्यात आला आहे.

भाग भांडवल आणि अर्जित राशी हे नागरी बँकांच्या स्वनिधीचे मुख्य स्त्रोत आहेत. किमान बंदिस्त कालावधीनंतर सभासद भाग भांडवल काढून घेऊ शकतात. यामुळे समभागाची सर्व वैशिष्ट्ये नागरी बँकाच्या भागांमध्ये आढळत नाहीत. सहकारी बँकांना प्रिमियमने शेयर्स जारी करण्याची परवानगी सुध्दा नसते. नागरी बँकांच्या भांडवल उभारणीच्या पर्यायी मार्गाचा चिकित्सात्मक अभ्यास करण्यासाठी श्री. एन. एस. विश्वनाथन यांच्या अध्यक्षतेखाली कार्यबलाची नियुक्ती करण्यात आली. या कार्यबलात रिझर्व्ह बँक, राज्य सरकारे आणि नागरी सहकारी बँकांचे प्रतिनिधी यांचा समावेश आहे. या कार्यबलाने आपला अहवाल सादर केला असून सार्वजनिक मत घेण्यासाठी तो मांडला गेला आहे. एकंदरित, रिझर्व्ह बँकेच्या रचनात्मक सुधारणांच्या धोरणामुळे बँकाची वित्तीय शक्ती वाढण्यास मदत होणार आहे. पण यामुळे बिगर अर्थक्षम नागरी बँकाचे स्वतंत्र अस्तित्त्व राहणार नाही, हेही लक्षात घेतले पाहिजे.

**दूरदर्शी निकष :**

आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम व्यवहार पध्दतीनुसार बँकानी दिलेली कर्जे अनिष्पादित ठरविण्यासाठी कर्जवसुलीची १८० दिवसाची मुदत ३१ मार्च, २००४ पासून ९० दिवसांइतकी कमी करण्यात आली. तथापि, काही नागरी सहकारी बँकाच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांना याबाबतीत सुट देण्यात आली. १०० कोटी रूपयांपेक्षा कमी ठेवी असणाऱ्या आणि एकाच जिल्ह्यात शाखा असणाऱ्या नागरी बँकांना ९० दिवसांऐवजी १८० दिवसांची मुदत देण्यात आली. तथापि, ही सूट केवळ मार्च, २००७ पर्यंतच देण्याचे ठरविले आहे. या दरम्यान या बँकानी ९० दिवस मुदतीच्या निकषाचा स्वीकार करण्यासाठी पुरेशा तरतुदी करणे व त्यांची कार्यपध्दती सुधारणे आवश्यक आहे.

अलीकडील काळातील पतपुरवठ्याचा विस्तार लक्षात घेऊन मानक अग्रिमांसाठी सामान्य प्रावधान नोव्हेंबर २००५ पासून सूचित व्यापारी बँकाबाबत ०.२५ टक्का यांवरून ०.४० टक्कापर्यंत वाढविण्यात आले आहे. यात शेती आणि लघु व मध्यम उद्योगांना दिल्या जाणाऱ्या अग्रिमांचा विचार करण्यात आलेला नाही. एका जिल्ह्यात काम करणाऱ्या व १०० कोटी रूपयांपेक्षा अधिक ठेवी असणाऱ्या बँका आणि एका जिल्ह्यापेक्षा अधिक जिल्ह्यात कार्य करणाऱ्या सर्व नागरी बँका यांना ही उच्च प्रावधान अट लागू करण्यात आली आहे. केवळ एकाच जिल्ह्यात शाखा असणाऱ्या आणि १०० कोटी रूपयांपेक्षा कमी ठेवी असणाऱ्या नागरी बँकांबाबत पूर्वीची ०.२५ टक्के प्रावधनाची अट कायम राखण्यात आली. बँकांनी केलेले हे प्रावधान किंवा तरतूद भांडवल पर्याप्तता प्रमाणाच्या संदर्भात विचारात घेतली जाईल.

एप्रिल, २००१ मध्ये नागरी सहकारी बँकांना हे सूचित करण्यात आले होते की, त्यांनी १९४९ मधील बँकिंग नियमन कायद्यातील २४ व्या कलमानुसार त्यांच्या मालमत्तेचा विशिष्ट हिस्सा सरकारी किंवा मान्यताप्राप्त प्रतिभूतींमध्ये गुंतविला पाहिजे. तथापि, सरकारी प्रतिभूतींमधील गुंतवणुकीबाबत येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन १०० कोटी रूपयांपेक्षा कमी ठेवी असणाऱ्या बँका आणि एकाच जिल्ह्यात शाखा असणाऱ्या बँकांना सरकारी प्रतिभूतींमधील गुंतवणुकीच्या जोखमींपासून वाचविण्यासाठी त्यांना सार्वजनिक क्षेत्राातील बँकांमध्ये व्याजाच्या उद्देशाने ठेवलेल्या ठेवींच्या मर्यादेपर्यंत २५ टक्क्यांच्या वैधानिक रोखता गुणेत्तरापासून (SLR) अंशत: सूट देण्यात आली आहे. यामुळे नागरी बँकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

भांडवल पर्याप्तता प्रमाणावरून बँकांची आर्थिक स्थिती लक्षात येते. बँकेच्या स्वनिधीचे एकूण ठेवीशी व एकूण संपत्तीशी असणाऱ्या प्रमाणावरून भांडवल पर्याप्तता ठरविली जाते. रिझर्व्ह बँकेने हे प्रमाण अनुक्रमे १६.२० टक्के आणि ७ टक्के असे ठरवून दिले आहे. नागरी सहकारी बँकांना हे प्रमाण साध्य करण्यासाठी स्वनिधी वाढवावा लागणार आहे. ठेवी आणि राखीव निधीच्या प्रमाणात वाढ करावी लागणार आहे. रिझर्व बँकेच्या निर्देशानुसार या बँकांना हे प्रमाण दरवर्षी १ ते २ टक्क्यांनी वाढवावे लागणार आहे. यासाठी नागरी सहकारी बँकांना ठेवीदारांना आकर्षित करण्यावर व अधिकाधिक राखीव निधीची तरतूद करण्यावर भर द्यावा लागणार आहे.

**पतपुरवठा :**

वित्तमंत्र्यानी जाहीर केल्याप्रमाणे लघु आणि मध्यम आकाराच्या उपक्रमांना होणाऱ्या पतपुरवठ्यात सुधारणा करण्याकरिता अशा उपक्रमांना दिल्या जाणाऱ्या कर्जाची पुनर्रचना करण्यासाठी ठरावीक मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली. नागरी सहकारी बँकांना संबंधित सहकार निबंधकाच्या मान्यतेने कर्ज पुनर्रचना योजना आखण्याबाबत सुचविण्यात आले आहे. तसेच या योजनांना योग्य प्रसिध्दी

देण्याबाबतही सूचना कळविण्यात आल्या आहेत.

**ग्राहक सेवामध्ये सुधारणा :**

नागरी सहकारी बँकांची ग्राहकसेवा आणि व्यावसायिक संधी सुधारण्यासाठी अनेक उपाय योजण्यात आले आहेत. रिझर्व्ह बँकेने सामंजस्य करार झालेल्या राज्यांमधील आणि बहुराज्यीय सहकारीसंस्था कायद्यांतर्गत नोंदणी झालेल्या बँकांना ठराविक अटींच्या अधीन राहून ग्राहकांचा प्रतिनिधी म्हणून म्युच्युअल फंड योजनेत सहभागी होण्यास परवानगी दिली आहे. तसेच रिझर्व्ह बँकेने चांगले व्यवस्थापन असलेल्या सूचित आणि असूचित नागरी बँकाना एटीएम सेवा सुरू करण्यास परवानगी दिली आहे. मार्च, २००६ मध्ये नागरी बँकांना दुहेरी दर्शनीय नोट गणना यंत्र बसविण्याबाबत सल्ला देण्यात आला आहे; जेणेकरून लोकांमध्ये पेपर बँडने सुरक्षित केलेल्या नोटांच्या बंडलाबाबत अधिक विश्वास निर्माण होईल.

सन २००५–०६ मधील मध्यावधी पाहणी अहवालानुसार बहुराज्यीय सहकारी संस्था कायद्यांतर्गत (२००२) स्थापना झालेल्या सूचित नागरी बँका आणि सामंजस्य करार केलेल्या राज्यातील बँकाकरिता चलनविषयक सुविधेचा (Currency Chest Facility) विस्तार करण्यात आला. या सुविधेचा लाभ घेण्याकरिता पात्र होण्यासाठी पुढीलप्रमाणे अटी ठरविण्यात आल्या.

(अ) २०० कोटी रूपयांइतकी किमान निव्वळ संपत्ती

(ब) भांडवलाचे जोखीमभारीत मालमत्तेशी असणारे गुणोत्तर (CRAR) १२ टक्के

(क) निव्वळ अनिष्पादित मालमत्तेचे प्रमाण १० टक्क्यांपेक्षा कमी

(ड) मागील तीन वर्षात तोटा वजा जाता उत्पन्न प्राप्त झाले असले पाहिजे.

(इ) रोख राखीव निधी गुणोत्तर (CRR) आणि वैधानिक रोखता गुणोत्तर (SLR) यांचे योग्य पालन झाले असले पाहिजे.

(फ) संचालक मंडळात किमान दोन व्यावसायिक व्यक्तींची निवड झालेली असली पाहिजे.

नागरी सहकारी बँकांना सरकारी प्रतिभूती बाजारात सहभागी होण्यासाठी उत्तेजन देण्यात आले आहे. सरकारी प्रतिभूतींच्या रेपो बाजाराचा विस्तार करण्याच्या उद्देशाने सूचित नागरी बँकांशिवाय असूचित नागरी बँकांना रेपो बाजारात सहभागी होण्याकरिता चालना देण्यात आली आहे. नागरी बँकांना बँकेत्तर वित्तीय कंपन्यांशी वायद्याचे करार करण्यास परवानगी नव्हती. तथापि, नागरी सहकारी बँका आणि सरकारी प्रतिभूतींचे अधिकृत प्राथमिक व्यापारी यांच्यातील व्यवहारांवर प्रतिबंध असणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले. नागरी बँकांनी ग्राहक सेवा सुधारणा तरतुदींचा लाभ घेतल्यास त्यांना आपली ग्राहक संख्या वाढविण्यास मदत होणार आहे.

**व्यवस्थापकीय कार्यक्षमता :**

भारतातील नागरी सहकारी बँकांना दिल्या जाणाऱ्या विशेष सवलती जागतिकीकरणाच्या धोरणामुळे कमी झाल्या आहेत. व्यापारी बँकांशी तुलना करता काही बाबतीत नागरी सहकारी बँकांवर बंधने घातली गेली आहेत. यामुळे या बँकांना आपल्या व्यवसायाच्या विकासासाठी व्यवस्थापन कार्यक्षम बनविणे आवश्यक आहे. केवळ ठेवी स्वीकारणे व कर्जे देणे ही पारंपारिक कार्ये न करता कार्यामध्ये विविधता आणावी लागणार आहे. बदलत्या परिस्थितीनुसार या बँकांना नवनव्या सेवासुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्वीकारावी लागणार आहे. कर्जाचे सुयोग्य वितरण, कर्ज वापराकडे लक्ष व कार्यक्षम व्यवस्थापन याकडे नागरी सहकारी बँकांना लक्ष द्यावे लागणार आहे.

**व्याजदराची रचना :**

रिझर्व्ह बँकेच्या पतविषयक धोरणानुसार ठेवी व कर्जावरील व्याजदर ठरतात. पूर्वी व्याजदरावर कडक नियंत्रण होते. पण १९९१ मधील नरसिंहम समितीच्या शिफारशीनुसार व्याजदराचे विनियंत्रण

(Deregulation) करण्यात आले. व्याजदराबाबत बँकांना स्वातंत्र्य मिळाले असले तरी रिझर्व्ह बँकेने ठेवीवरील कमाल व्याजदर ठरवून दिला आहे. बँकांना यापेक्षा अधिक दराने व्याज देता येत नाही. परिणामी, इतर बँकांपेक्षा अधिक व्याजदर देवून ठेवी आकर्षित करण्याचा प्रयत्न नागरी सहकारी बँकांना करता येणार नाही. तथापि, बचत ठेवी व चालू ठेवीवरील व्याजदरात फारसा बदल झालेला नाही. नागरी सहकारी बँकांना बचत ठेवी व चालू ठेवीवर अनुक्रमे १ टक्का व अर्धा टक्का जास्त व्याजदर देण्याची मुभा देण्यात आली आहे. अलीकडे रिझर्व्ह बँकेने एक वर्षावरील मुदत ठेवीवरील व्याजदर पूर्णपणे मुक्त केले आहे. पण यामुळे बँकांमध्ये जास्तीतजास्त व्याजदराची स्पर्धा सुरू होऊ शकते. एका वर्षाखालील व्याजदर ठरविताना बँकेची क्षमता व स्पर्धा या दोन्ही बाबींना अधिक महत्त्व लाभगार आहे.

**उपसंहार :**

जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर रिझर्व्ह बँकेने केलेल्या धोरणात्मक बदलामुळे नागरी सहकारी बँकांना इतर बँकांशी स्पर्धा करावी लागत आहे. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी या बँकांना आपली आर्थिक सक्षमता वाढवावी लागणार आहे. काही नागरी बँकांमध्ये गैरव्यवहाराची प्रकरणे घडल्याने संपूर्ण नागरी बँकेच्या क्षेत्राला लोकांचा विश्वास अबाधित राखण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. नव्या धोरणांमुळे नागरी बँकांना रोख्यांमधील गुंतवणूक वाढवावी लागणार आहे. पण नागरी बँकांच्या दृष्टीने ते जिकीरीचे आहे. याशिवाय, या बँकांना भांडवल पर्याप्तता प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत. थकबाकीच्या समस्येतून बाहेर पडण्यासाठी या बँकाना कर्जविषयक धोरणात योग्य बदल करावे लागणार आहेत. योग्य, पात्र व उत्पादक कर्जदारांना कर्जपुरवठा करण्यावर भर द्यावा लागणार आहे. तसेच व्यवस्थापकीय कार्यक्षमता वाढविण्याचे आव्हानही या बँकांपुढे आहे. अनिष्पादित मालमत्तेचे प्रमाण कमी करण्यावर भर द्यावा लागणार आहे. अन्यथा त्याचा विपरीत परिणाम बँकांच्या उत्पन्नावर होणार आहे. एकंदरीत, व्याजदराची मुक्त रचना इतर बँकांशी स्पर्धा, रिझर्व्ह बँकेचे कडक नियमन व आर्थिक सुदृढता वाढविण्यात आलेले उपयश इत्यादी कारणांमुळे नागरी सहकारी बँकांची स्थिती नाजूक बनली आहे. तथापि, या बँकांना सहकारी तत्त्वांची बँकींग तत्त्वांशी व व्यवहाराशी गाठ घालून यातून मार्ग काढता येणे शक्य आहे. इतर बँकांच्या स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी नागरी बँकांना भागभांडवल व ठेवीमध्ये वाढ करावी लागणार आहे. कर्मचारी, व्यवस्थापक व संचालक मंडळाला प्रशिक्षण द्यावे लागणार आहे. या बँकांना बँक सेवांमध्ये विविधता आणणे, सेवांचा दर्जा सुधारणे, अल्प खर्चात सेवा पुरविणे यासारखे प्रयत्न करावे लागतील. रिझर्व्ह बँकेच्या धोरणातील सकारात्मक पैलूंचा अधिकाधिक स्वीकार करणे व त्याव्दारे आपली कार्यक्षमता वाढविणे नागरी बँकांना शक्य आहे.

**संदर्भ सूची :**


१. अर्थसंवाद, ऑक्टोबर – डिसेंबर, २००४, खंड २८, अंक ३

२. Various Issues Of Report On Trend And Progress Of Banking In India

३. Various Issues Of 'Annual Report Of RBI'

४. Various Issues Of Economic And Political Weekly

५. सहकाराचा विकास – शहा/दामजी